# जाहिरात

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ व नियम दि. ०९/१२/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. कलम ६ (१) अंतर्गत जिल्हा स्तरावर "स्थानिक तक्रार समिती" गठीत करण्याची तरतूद आहे. सदर कायद्यान्वये स्थानिक तक्रार समितीत अध्यक्ष व दोन सदस्य हे अशासकीय सामाजिक कार्यकर्ते असणार आहे. सदर समितीत अध्यक्ष व दोन सदस्यांची नियुक्ती जिल्हाअधिकारी यांना करावयाची असल्याने समितीत काम करु ईच्छित असणा-या अशासकीय सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रस्ताव या जाहीरातीद्वारे मागविण्यात येत आहे. अध्यक्ष व सदस्य यांची पात्रता खालीलप्रमाणे असावी.

१. **अध्यक्षः** सामाजिक कार्याचा ५ वर्षाचा अनुभव असलेल्या आणि महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या महिलांमधुन नामनिर्देशिनाने अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येईल.

२. **दोन सदस्यः** महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या अशा अशासकीय संघटना/संघ किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती यामधुन दोन सदस्य नामनिर्देशित करावेत, त्यांच्यापैकी किमान एक सदस्य महिला असावी.

    १. परंतु, त्यापैकी किमान एका नामनिर्देशित सदस्यांची पार्श्वभुमी प्राधान्याने कायद्याची (Legal) असावी.

    २. तसेच त्यापैकी किमान एक नामनिर्देशित सदस्य अनुसुचित जाती, अनुसुचित जमाति किंवा ईतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी.

स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक नसेल. या समितीचे कार्यक्षेत्र नागपुर जिल्हयापुरते मर्यादित असेल. अशासकीय सदस्यांना कायदयाच्या नियम ५ नुसार देय भत्ता व प्रवासखर्च मिळेल.

वरील पात्रता असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांचे **प्रस्ताव जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय, ६ वा माळा, ए विंग, सिविल लाईन्स, नागपुर -०१ या कार्यालयात जाहीरात वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत सादर करावे.**

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. अध्यक्ष व दोन सदस्य, त्यापैकी किमान एका नामनिर्देशित सदस्यांची पार्श्वभुमी प्राधान्याने कायद्याची (Legal) असावी आणि एक नामनिर्देशित सदस्य अनुसुचित जाती, अनुसुचित जमाति किंवा ईतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी.
२. स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक नसेल.
३. अर्ज आवेदनासमवेत चारित्र प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
४. अर्जदारावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसावा. असे आढळल्यास समितीचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.
५. अर्जदाराने १००/- रु. स्टॅम्प पेपरवर समितीत काम करण्यास ईच्छुक असल्याचे हमीपत्र दयावे.
६. कोणत्या पदाकरिता अर्ज केलेला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
७. आवश्यक प्रमाणपत्रे/ दस्तावेज सोबत जोडणे आवश्यक आहे.

अपर जिल्हाधिकारी तथा
जिल्हा-अधिकारी (का ठि म लै छ सं अ)
स्थानिक तक्रार समिती, नागपुर